15 MAR 2017 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतराव चव्हाण महान होऊनही विनम्र

## विजय कुवळेकर : शिवाजी विद्यापीठात 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष : यशवंतराव चव्हाण' ग्रंथाचे प्रकाशन

कोल्हापूर : सातत्यपूर्ण वाचनामुळेच यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिपादनात कधीही पुनरावृत्ती आढळत नाही. महान होऊनही विनम्र असण्याचे, संयत पद्धतीने व्यक्त होण्याचे मूळही त्यातच आढळते. वाचनानेच यशवंतरावांसारखा निष्कलंक चारित्र्याचा पारदर्शक आणि निखळ माणूस घडला, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर यांनी मंगळवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण अध्यासन आणि आनंद ग्रंथसागर प्रकाशनातर्फे आयोजित डॉ. आनंद पाटील लिखित 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष : यशवंतराव चव्हाण' या ग्रंथाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहातील कार्यक्रमास त्रिपुराचे माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील हे प्रमुख उपस्थित, तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष : यशवंतराव चव्हाण' या ग्रंथाचे प्रकाशन त्रिपुराचे माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी डावीकडून डॉ. बी. पी. साबळे, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. देवानंद शिंदे, विजय कुवळेकर, डॉ. आनंद पाटील, डॉ. जे. एफ. पाटील उपस्थित होते.

### वैचारिक, तत्वज्ञानदृष्ट्या समृद्ध

ज्येष्ठ पत्रकार कुवळेकर म्हणाले, स्वखर्चाने आठ हजारांहून अधिक ग्रंथ खरेदी करून त्यांचे वाचन करणारा आणि त्यातून प्राप्त ज्ञानाचा आपल्या राष्ट्रासाठी वापर करणारा यशवंतरावांसारखा दुर्मीळ नेता आपल्याला लाभला. यशवंतरावांनी त्यांच्या हयातीत अनेक मोठमोठी पदे भूषविली. त्यातून ते आर्थिकदृष्ट्या श्रीमंत झाले नाहीत. तथापि, वाचनामुळे ते वैचारिक आणि तत्त्वज्ञानदृष्ट्या मात्र अत्यंत समृद्ध झाले.

ज्येष्ठ पत्रकार कुवळेकर म्हणाले, सभ्यता, सुसंस्कृतता आणि अभिजातता यांचा तिहेरी संगम यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वात आढळतो. त्याचे प्रतिबिंब 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष'च्या पानोपानी आढळते. ग्रंथांतून वाचलेले तत्त्वज्ञान आपल्या जीवनात आचरणात आणण्याचा प्रयत्न करणारा नेता म्हणजे यशवंतराव होते. माजी राज्यपाल डॉ. डी. वाय. पाटील म्हणाले, अप्रतिम वक्तृत्व आणि अफाट वाचन असणाऱ्या यशवंतरावांची कामगिरी अतुलनीय आहे. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, नीतिमूल्यांबद्दल अत्यंत आग्रही असणाऱ्या यशवंतराव चव्हाण यांनी तितक्याच सचोटीने विविध क्षेत्रांत कार्य केले. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. पाटील म्हणाले, चिरंतन विचार देणारा हा ग्रंथ असून डॉ. आनंद पाटील यांनी एक वेगळा ग्रंथ लिहिला आहे. कार्यक्रमात लेखक डॉ. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
15 MAR 2017 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'यशवंतरावांची वैचारिक श्रीमंती आदर्शवत'

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'सभ्यता, सुसंस्कृतता आणि अभिजात शैली यांचा तिहेरी संगम यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्वात आढळतो. त्याचे प्रतिबिंब 'ग्रंथांनी रचलेला महापुरूष' या ग्रंथात पानोपानी आढळते. हा ग्रंथ केवळ साहित्यिक आणि राजकीय व्यक्तींपुरता मर्यादित नसून युवकांना दिशा, प्रेरणा, व्यासंग आणि अज्ञान दूर करणारा आहे' असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार, साहित्यिक आणि राज्याचे माजी माहिती आयुक्त विजय कुवळेकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण अध्यासन केंद्र व आनंद ग्रंथसागर प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष : यशवंतराव चव्हाण' या डॉ. आनंद पाटील लिखित ग्रंथाचा प्रकाशन सोहळा मंगळवारी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झाला. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.



शिवाजी विद्यापीठात ग्रंथ प्रकाशन करताना डॉ. डी. वाय. पाटील. यावेळी डावीकडून अण्णासाहेब चव्हाण, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, विजय कुवळेकर, डॉ. आनंद पाटील, जे. एफ. पाटील.

'यशवंतराव चव्हाण यांना महाराष्ट्राने राज्यापुरते संकुचित करून ठेवले, हे दुर्दैव आहे. त्या विचारसरणीतून बाहेर काढणारा हा एक वेगळा वाङ्मयीन चरित्रग्रंथ आहे' असे सांगून कुवळेकर म्हणाले, 'राष्ट्रीय पातळीवरील असामान्य नेत्याचे विचारचरित्र या ग्रंथाच्या माध्यमातून साकारले आहे. आजकाल वाचणारे नेते कमी होत आहेत. सर्वांनाच यशाचे शॉर्टकट हवे आहेत. सभ्यता, सुसंस्कृतपणाची पातळी खालावते आहे. या पार्श्वभूमीवर स्वखर्चाने आठ हजारांहून अधिक ग्रंथ खरेदी करून त्यांचे वाचन करणारा आणि त्यातून प्राप्त ज्ञानाचा राष्ट्रासाठी वापर करणारा यशवंतरावांसारखा दुर्मिळ नेता आपल्याला लाभला. यशवंतरावांनी अनेक मोठी पदे भूषविली. त्यातून ते आर्थिकदृष्ट्या श्रीमंत झाले नाहीत; तथापि, वाचनामुळे ते वैचारिक आणि तत्त्वज्ञानदृष्ट्या समृद्ध झाले.'

पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या सहवासातील आठवणींना उजाळा दिला. अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, 'महाराष्ट्राच्या प्रगतीचे यशवंतराव चव्हाण शिल्पकार होते. नितीमूल्यांबद्दल अत्यंत आग्रही असणाऱ्या या नेत्याने तितक्याच सचोटीने विविध क्षेत्रांत कार्य केले. त्याचा स्वतंत्र ठसा उमटविला.'

यावेळी डॉ. जे. एफ. पाटील, लेखक डॉ. आनंद पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. आण्णासाहेब चव्हाण, डॉ. बी. पी. साबळे उपस्थित होते. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. अध्यासनाचे संचालक डॉ. ए. एम. गुरव यांनी आभार मानले.

15 MAR 2017

जनसंपर्क कक्ष
तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतरावांना महाराष्ट्राने संकुचित केले

## ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर यांचे मत : 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष' चरित्रग्रंथाचे प्रकाशन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

यशवंतराव चव्हाण यांना महाराष्ट्राने राज्यापुरते संकुचित करून ठेवले आहे. हे दुर्दैवी असून, त्या विचारसरणीतून बाहेर काढणारा 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष' हा वेगळा वाङ्मयीन चरित्रग्रंथ आहे, असे मत ज्येष्ठ पत्रकार तथा राज्याचे माजी माहिती आयुक्त विजय कुवळेकर यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण अध्यासन आणि आनंद ग्रंथसागर प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष' या डॉ. आनंद पाटील यांनी लिहिलेल्या ग्रंथाचा प्रकाशन सोहळा विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झाला यावेळी ते बोलत होते. पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे अध्यक्षस्थानी होते.

विजय कुवळेकर म्हणाले, राष्ट्रीय पातळीवरील असामान्य नेत्याचे विचारचरित्र या ग्रंथाच्या माध्यमातून साकारले आहे. आजकाल वाचणारे नेते कमी होताहेत. साऱ्यांनाच यशाचे शॉर्टकट हवे आहेत. स्वखर्चाने आठ हजारांहून अधिक ग्रंथ खरेदी करून त्याचे वाचन करणारा व त्यातून प्राप्त ज्ञानाचा आपल्या राष्ट्रासाठी वापर करणारा यशवंतरावांसारखा दुर्मिळ नेता आपल्याला लाभला. ग्रंथातून वाचलेले तत्वज्ञान आपल्या जीवनात आचरणात आणण्याचा प्रयत्न करणारा नेता म्हणजे यशवंतराव, असा उल्लेख करून कुवळेकर म्हणाले, सातत्यपूर्ण वाचनामुळेच यशवंतरावांच्या प्रतिपादनात कधीही पुनरावृत्ती आढळत नाही.



**कोल्हापूर : 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष' या ग्रंथाचे प्रकाशन करताना ज्येष्ठ पत्रकार विजय कुवळेकर. सोबत आण्णासाहेब चव्हाण, डॉ. विलास नांदवडेकर, पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. आनंद पाटील व डॉ. जे. एफ. पाटील.**

महान होऊनही विनम्र असण्याचे व संयत पद्धतीने व्यक्त होण्याचे मूळही त्यातच आढळते. वाचनानेच यशवंतरावांसारखा निष्कलंक चारित्र्याचा पारदर्शक व निखळ माणूस घडला. डॉ. डी. वाय. पाटील, कुलगुरू डॉ. शिंदे यांनी, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. आनंद पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्वागत केले. डॉ. ए. एम. गुरव यांनी आभार मानले. डॉ. आण्णासाहेब चव्हाण, डॉ. बी. पी. साबळे उपस्थित होते.

### कुणब्याचा पोर ते देशाचा उपपंतप्रधान....

कुणब्याचा पोर ते देशाचा उपपंतप्रधान, अशी मजल मारणाऱ्या यशवंतरावांची मुळे मातीत घट्ट रोवलेली होती. आकाशाला गवसणी घालण्याचे बळ वाचनाने त्यांच्या पंखांत निर्माण केले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात आढळणाऱ्या मानवतावादी विचारसरणीची बिजे वाचनानेच निर्माण केली. वाचनामुळे ते वैचारिक तत्त्वज्ञानदृष्ट्या अत्यंत समृद्ध झाले, असे विजय कुवळेकर यांनी स्पष्ट केले.

### ग्रंथांत यशवंतरावांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे दर्शन

सभ्यता, सुसंस्कृतता आणि अभिजातता यांचा तिहेरी संगम यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्त्वात आढळतो. त्याचे प्रतिबिंब 'ग्रंथांनी रचलेला महापुरुष' या ग्रंथात पानोपानी दिसून येते, असेही कुवळेकर यांनी नमूद केले.

15 MAR 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# डॉ. लवटे यांना राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार जाहीर

**कोल्हापूर** : महाराष्ट्र हिंदी साहित्य अकादमीतर्फे दिला जाणारा महाराष्ट्र भारती अखिल भारतीय हिंदी सेवा पुरस्कार–२०१५ डॉ. सुनिलकुमार लवटे यांना जाहीर झाला आहे, अशी माहिती अकादमीचे अध्यक्ष डॉ. नंदलाल पाठक यांनी एका पत्रकातून कळवली आहे. डॉ. लवटे यांनी शिवाजी विद्यापीठाचे मानसेवी प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक, वि.स.खांडेकर वस्तुसंग्रहालय मानद संचालक म्हणून कार्य केले आहे. तसेच महावीर महावीर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य व हिंदी विभागप्रमुख म्हणून काम पाहिले आहे. वि.स.खांडेकर व डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या साहित्याचे त्यांनी हिंदीत अनुवाद केले आहे. अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रम पूनर्रचनेत त्यांचा मोलाचा वाटा आहे. हिंदीत त्यांचे २५ ग्रंथ प्रकाशित आहेत. राष्ट्रीय जीवन गौरव सन्मान म्हणून प्रदान करण्यात येणारा पुरस्कार डॉ. लवटे यांना जाहीर झाल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. एक लाख रूपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. डॉ. लवटे सध्या विश्व हिंदी संमेलन इतिहास, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय हिंदी संग्रहालय निर्मितीत व्यस्त आहेत.



15 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लवटे यांना 'राष्ट्रीय जीवन गौरव सन्मान'

## हिंदी अकादमी : मुंबईत २५ मार्चला वितरण

**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमीचा 'महाराष्ट्र भारती अखिल भारतीय हिंदी सेवा पुरस्कार २०१५' येथील कसदार लेखक व माजी प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे यांना मंगळवारी जाहीर झाला. अकादमीचे अध्यक्ष डॉ. नंदलाल पाठक यांनी त्याची घोषणा केली. एक लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असून, मुंबईत २५ मार्चला होणाऱ्या शानदार समारंभात या पुरस्काराचे वितरण होणार आहे. डॉ. लवटे हे 'लोकमत'मध्ये सध्या 'वाचावे असे काही' हे सदर दर शुक्रवारी लिहीत आहेत.

“ ही अकादमी हिंदी भाषिक व अभाषिक गटांतून दोन पुरस्कार देते. मला अभाषिक गटातून हा बहुमान मिळाला. अकादमीने माझ्या कामाची इतकी चांगली दखल घेतली, याचा मला आश्चर्याचा धक्का बसला. चांगले करत रहा... समाज तुमची दखल घेतो, अशी माझी भावना आहे.



**डॉ. सुनीलकुमार लवटे**

हिंदी वेब साहित्यातील मूलभूत संशोधन, हिंदीतील मौलिक जागतिक योगदान, निरंतर मुक्त शिक्षण अभ्यासक्रमात क्रांतिकारी बदल, मराठी पुरोगामी साहित्याची हिंदीत भाषांतरे या त्यांच्या कार्याची नोंद घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात येत आहे. डॉ. लवटे यांनी शिवाजी विद्यापीठाचे मानसेवी प्राध्यापक, संशोधन मार्गदर्शक, वि. स. खांडेकर वस्तुसंग्रहालयाचे मानद संचालक म्हणून काम केले आहे. ते महावीर महाविद्यालयाचे प्राचार्य व हिंदी विभागप्रमुख होते. त्यांनी हिंदीत यशपाल, अनंत गोपाल शेवडे, डॉ. शंकर शेष यांच्यावर मौलिक संशोधन व लेखन केले आहे. वि. स. खांडेकर व डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे साहित्य त्यांनी हिंदीत भाषांतरित केले आहे. अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रम पुनर्रचनेत त्यांचा मोलाचा वाटा आहे. हिंदीत त्यांचे २५ ग्रंथ प्रकाशित आहेत.

15 MAR 2017 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व

**शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागात डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यान बुधवारी (ता. १५) आयोजित केले आहे. त्यानिमित्ताने...**

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे समाजशास्त्रज्ञ, जैन विद्याविशारद, ज्येष्ठ संशोधक, संपादक, लेखक तथा शिवाजी विद्यापीठाच्या शाहू संशोधन केंद्राचे मानद संचालक, थोर विचारवंत व चिंतनशील व्यक्तिमत्त्व अशी डॉ. विलास संगवे यांची बहुविध ओळख सांगता येईल.

डॉ. संगवे यांचा जन्म २ जून १९२० रोजी सोलापूर येथे झाला. त्यांचे आई-वडील प्राथमिक शिक्षक होते. त्यांच्या सुसंस्कारामध्ये शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर मुंबई विद्यापीठाची बी. ए. (ऑनर्स) ही पदवी संपादन करून समाजशास्त्र व अर्थशास्त्र या विषयांमधील एम.ए.ची पदवी प्राप्त केली. मुंबई विद्यापीठामध्येच १९५० ला त्यांची पीएच.डी. झाली.

ज्ञानदान आणि ज्ञानप्रसाराचे ध्येय स्वीकारून कर्नाटक कॉलेज, राजाराम कॉलेज तद्नंतर शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे समाजशास्त्र विषयाचे विभागप्रमुख म्हणून १९७५-१९८० या कालावधीत अध्यापनाचे कार्य केले. शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे ते शिल्पकार म्हणून परिचित आहेत.

समाजशास्त्र, इतिहास, जैन धर्म आणि भारतीय संस्कृती या विषयांवर डॉ. संगवे यांचे ४२ ग्रंथ प्रसिद्ध झाले असून त्यांचे नावाजलेल्या आंतरराष्ट्रीय पत्रिकांमध्ये ७५ शोधनिबंध प्रकाशित झाले आहेत. याचबरोबर जैन विद्या, समाजशास्त्र आणि सामाजिक इतिहास या विषयांवर त्यांनी लिहिलेले शंभरहून अधिक संशोधनपर लेख विद्वन्मान्य झाले आहेत.



डॉ. विलास संगवे

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या सर्वांगीण कार्याचे शैक्षणिक व सामाजिक सुधारणांचे आणि सामाजिक इतिहासावर झालेल्या प्रभावांचे डॉ. संगवे यांनी १९७६ पासून २००६ पर्यंत साधार, सखोल आणि सातत्याने संशोधन केले आहे. त्यांनी यासाठी दोन हजार सहाशे पंचावन्न इतकी शाहूकालीन कागदपत्रे संशोधित केली, पाच हजारांहून अधिक पृष्ठांमध्ये नऊ खंडाच्या ग्रंथमालेचे संशोधन, संपादन आणि लेखन त्यांनी अत्यंत निष्ठेने, निरपेक्षपणे आणि सेवाभावी वृत्तीने संपादित केले. डॉ. संगवे यांचे कर्तृत्व सामाजिक शास्त्रातील विद्यार्थ्यांना, शिक्षकांना तसेच संशोधकांना प्रेरणादायी असल्याने त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी स्मृती व्याख्यानाचे आयोजन केले आहे. डॉ. संगवे यांचा अधिक सहवास मिळालेले माजी समाजशास्त्र विभागप्रमुख, प्रा. डॉ. एस. एन. पवार 'डॉ. विलास संगवे यांचे समाजशास्त्रातील योगदान' या विषयावर भाष्य करणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कुलगुरू प्रा. देवानंद शिंदे भूषविणार आहेत.

- प्रा. डॉ. जगन कराडे
(समाजशास्त्र विभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ)

15 MAR 201 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : लोकनेते बाळासाहेब देसाई यांच्या जयंती दिनानिमित्त शहाजी महाविद्यालयात चर्चासत्रप्रसंगी उपस्थित मान्यवर.

# शहाजी महाविद्यालयात चर्चासत्र

कोल्हापूर, ता. १४ : श्री शहाजी महाविद्यालय, बाळासाहेब देसाई अध्यासन, शिवाजी विद्यापीठातर्फे एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र झाले. 'बाळासाहेब देसाई यांचे आधुनिक महाराष्ट्राच्या विकासातील योगदान' यावर चर्चा झाली. प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे अध्यक्षस्थानी होते. प्रा. डॉ. भारती पाटील म्हणाल्या, ''बाळासाहेब देसाई हे शिवाजी विद्यापीठ, कोयना धरणाचे शिल्पकार आहेत. सार्वजनिक बांधकाम मंत्री, शिक्षणमंत्री, गृहमंत्री म्हणून आधुनिक महाराष्ट्राच्या विकासात पायाभूत काम केले. लोकराजा छत्रपती शाहू महाराजांच्या विचाराचा वारसा पुढे नेण्यासाठी त्यांनी कोल्हापुरातच शिवाजी विद्यापीठाचा आग्रह धरला. ईबीसी सवलतीची योजना पुढे आणली.'' डॉ. मोरे, डॉ. ए. जी. थोरात, प्रा. डॉ. व्ही. पी. पवार, प्रा. डॉ. राजेखान शानेदिवाण, प्रा. डॉ. बी. एस. माळी यांनी आढावा घेतला. प्रा. डॉ. अवनीश पाटील यांनी अध्यासनाची माहिती दिली. प्राचार्य डॉ. एच. एस. वनमोरे, शिवराज देसाई आदी उपस्थित होते.